मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी द्वारा संचालित

# महात्मा गांधी कला, विज्ञान व
# स्व. नसरूद्दीनभाई पंजवानी वाणिज्य महाविद्यालय

आरमोरी, जि. गडचिरोली

नॅक पुनर्मानांकित 'अ' दर्जा

# अहवाल

## २०२०-२१

राष्ट्रीय सेवा योजना आणि शारीरिक शिक्षण व खेळ विभाग

## "व्यक्तिमत्व विकास शिबिर"

दिनांक १८ जूलै २०२१ ते २५ जूलै २०२१

आयोजक

डॉ. लालसिंग खालसा

प्राचार्य

समन्वयक

प्रा. एस. एम. सोनटक्के
रासेयो प्रमुख

प्रा. सीमा नागदेवे
रासेयो कार्यक्रम अधिकारी

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे
शा.शि., खेळ, व क्रीडा प्रमुख

प्रा. गजानन बोरकर
विद्यार्थी विकास विभाग प्रमुख

# अहवाल

## “व्यक्तिमत्व विकास शिबिर”

### नियाजित कार्यक्रम

- दिनांक १८ जूलै २०२१

  शिबिराचे उद्‌घाटन समारंभ
- दिनांक १९ जूलै २०२१

  व्याख्यान
- दिनांक २० जूलै २०२१

  व्याख्यान
- दिनांक २१ जूलै २०२१

  गटचर्चा
- दिनांक २२ जूलै २०२१

  व्याख्यान
- दिनांक २३ जूलै २०२१

  व्याख्यान
- दिनांक २४ जूलै २०२१

  व्याख्यान
- दि. २५ जूलै २०२१

  शिबिराचा समारोप

# अहवाल "व्यक्तिमत्व विकास शिबिर"

शरीराचा रंग व ठेवण तथा बुध्दी घेवून व्यक्ती जन्माला येते. या गोष्टी तिला अनुवंशिकतेने मिळालेल्या असतात. पण त्याच्यावर योग्य संस्कार व चांगली जडणघडण झाल्यास त्याच्या व्यक्तिमत्वात बदल घडून येतो महात्मा गांधी महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कटीबध्द आहे. हा महाविद्यालयाचा प्रमुख उद्देश आहे. म्हणूनच आमच्या महाविद्यालयात दिनांक १८ जूलै २०२१ ते दि. २५ जूलै २०२१ हया कालावधीत "व्यक्तिमत्व विकास शिबिर" संपन्न झाला.

**रविवार, दिनांक १८ जूलै २०२१** :— महाविद्यालयात व्यक्तिमत्व विकास शिबिराचा उद्घाटन सोहळा प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सेवा योजना, शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दि. १८ ते २५ जूलै २०२१ या साप्ताहीक ऑनलाइन शिबिराचा उद्घाटन सोहळा आभासी पद्धतीने पार पडला. ह्या शिबिराच्या उद्घाटन सोहळयास गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथील विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख डॉ. शैलेंद्र देव व विशेष अतिथी म्हणून श्री. गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय कुरखेडा येथील प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर उपस्थित होते.

या शिबिराचे उद्घाटक गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीतील विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख डॉ. शैलेंद्र देव यांनी २१ व्या शतकातील स्पर्धेच्या युगात व्यक्तिमत्त्व विकासाला अनन्य साधारण महत्त्व आहे. शिवाय दैनंदिन व्यवहारामुळे स्वत:ला इतरांच्या तुलनेत सरस ठेवण्यासाठी व्यक्तिमत्त्व विकासाची निकड अधिक आहे. आपल्या देशात आदर या शब्दाला प्रचंड महत्त्व आहे. जर तुम्ही समोरच्या व्यक्तीला आदर दिला, त्यांचा सन्मान केला तर तुमच्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगळीच झळाळी मिळते. त्यांच्या मनात तुमच्याविषयी चांगली भावना निर्माण होते. त्याचा तुम्हाला भविष्यात लाभ होतो. स्वत:मध्ये आत्मविश्वास, उत्साह निर्माण करणे गरजेचे आहे. एकूणच सर्वांगिण मानवी मूल्याची जोपासना करून व्यक्तिमत्त्वाला आकार द्यावा असे प्रतिपादन केले. शिबिराचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमिक शिक्षण घेत असताना जीवनव्यवहारात जगण्याचे कौशल्य देखील आत्मसात करावे असे म्हटले. जीवनात यशस्वी होण्यासाठी आणि नेतृत्व गुणसाठी व्यक्तिमत्त्व विकास होण्याची अत्यंत गरज असते. अनुकरणातून व्यक्तिमत्त्व विकास करण्यापेक्षा अंतबाह्य बदल घडवून मूल्ययुक्त भावनेतून व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी सहभागी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाच्या मूलसुत्रांची माहीती दिली व आदर्श नागरिक म्हणून पुढे जगण्यासाठी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. यावेळी विशेष अतिथी म्हणून श्री. गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय कुरखेडा येथील प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर यांनी 'महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व' या विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी रासेयोचे व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने असणारे महत्त्व पटवून दिले.

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

या कार्यशाळेत २४० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. शिबिराचे संचालन प्रा. सीमा नागदेवे यांनी केले तर आभार प्रा. सतेंद्र सोनटक्के यांनी मानले. शिबिराचे यशस्वी आयोजन शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा प्रमुख प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रा. गजानन बोरकर तसेच तंत्रसहायक प्रा. सुनील चुटे यांनी केले. कार्यशाळेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक सहभागी होते.

दररोज दोन सत्रात शिबिराचा कार्यक्रम संपन्न झाला. पहीले सत्र सकाळी १०.०० ते दुपारी ११.३० वाजेपर्यंत तसेच दुसरे सत्र दुपारी ११.३० ते १.०० वाजेपर्यंत होते. त्यानंतर शिबिरार्थ्यांचे प्रश्नोत्तराच्या माध्यमातुन समाधान केले जात होते.

**सोमवार दि. १९ जूलै २०२१** (सकाळी १०.०० ते दुपारी १.००)

पहिल्या सत्रात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी 'व्यक्तिमत्त्व विकासात संभाषण कौशल्याचे महत्त्व' या विषयावर आपले मत मांडले. याप्रसंगी त्यांनी समाजाचे नेतृत्व करताना नेतृत्वाचे महत्व पटवून दिले आणि नेतृत्व घडण्यासाठी संभाषण कौशल्याची आवश्यकता आहे असे मत व्यक्त केले तसेच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व घडतांना संभाषणाचे कौशल्य आवश्यक आहे याविषयी मत मांडले.

दुसऱ्या सत्रात प्रा. महेश जोशी यांनी 'व्यक्तिमत्त्व विकासा : योग आणि शारीरिक स्वास्थ' या विषयावर मार्गदर्शन करताना शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी योगाचे महत्व पटवून दिले.

**मंगळवार दि. २० जूलै २०२१** (सकाळी १०.०० ते दुपारी १.००)

पहिल्या सत्रात मा. श्री. तापोस मंडल यांनी 'नेटवर्कींग क्षेत्र व व्यक्तिमत्व विकास' या विषयावर विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना प्रदान केली. याप्रसंगी त्यांनी नेटवर्कींग क्षेत्रातील ज्ञानाची आवश्यकता काळाची गरज आहे. त्याचप्रमाणे या क्षेत्रातील ज्ञानाशिवाय विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास शक्य नाही असे मत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. विजय रैवतकर, मराठी विभाग यांनी 'भाषा आणि व्यक्तिमत्व विकास' या विषयावर विद्यार्थ्यांना संबोधन केले. भाषा हे विचार व्यक्त करण्याचे साधन आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीला आपला व्यक्तीमत्व घडवायचा असेल तर भाषिक संवाद हा सुस्पष्ट आणि मधुर असावा असे विचार व्यक्त केले.

**बुधवार दि. २१ जूलै २०२१** (सकाळी १०.०० ते दुपारी १.००)

'गटचर्चा : सहभागी प्रशिक्षणार्थी व समन्वयक'

शिबिराच्या चौथ्या दिवशी सहभागी प्रशिक्षणार्थ्यांमध्ये गटचर्चा घडवून आणली तसेच महाविद्यालयातील उत्कृष्ट माजी विद्यार्थी सुरज चौधरी व गीता वाटगुरे यांनी आपले अनुभव विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केले. त्यानंतर महाविद्यालयातील माजी रासेयो प्रमुख प्रा. शशिकांत गेडाम, प्रा. डॉ. राजेंद्र चव्हाण, प्रा. डॉ. विजय गोरडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात विद्यार्थ्यांबद्दलचे अनुभव कथन केले.

**गुरूवार दि. २२ जूलै २०२१** (सकाळी १०.०० ते दुपारी १.००)

पहिल्या सत्रात प्रा. पुडलिक व्याहाडकर, राज्यशास्त्र विभाग यांनी 'स्पर्धा परिक्षेमध्ये व्यक्तिमत्व विकासाचे महत्व' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी स्पर्धा परिक्षेमध्ये यश संपादन करण्यासाठी संयम, साहस

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

आणि कठोर परिश्रम आवश्यक आहे आणि हे सर्व विद्यार्थ्याच्या अंतर्गुणावर अवलंबून असते. म्हणून उत्तम व्यक्तिमत्व हे स्पर्धा परिक्षेचे गमक आहे असे मत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. विजय गोरडे, भूगोल विभाग यांनी 'व्यक्तीमत्त्व विकास, व्यावसायिक संधी व आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करताना वर्तमानकाळात कला, विज्ञान व वाणिज्य क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी योग्य माहिती मिळवून आपली व्यावसायिक संधी शोधावी, असे मत व्यक्त केले.

**शुक्रवार दि. २३ जूलै २०२१** (सकाळी १०.०० ते दुपारी १.००)

पहिल्या सत्रात मा. श्री. सागर दोनाडकर यांनी 'व्यक्तिमत्व विकास व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील संधी' या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की, आधुनिक युग हे तंत्रज्ञानाचे युग असून या क्षेत्रामध्ये अनेक संधी उपलब्ध आहेत. खरे तर आज कोरोना महामारीच्या काळात संगणक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आभासी पद्धतीने जगातील अनेक व्यवहार सुरू आहेत. म्हणून विद्यार्थ्यांनी या क्षेत्रातील ज्ञान मिळवून जीवन यशस्वी करू शकतात, असे मत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा प्रमुख यांनी 'व्यक्तिमत्व विकास व तणाव व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रत्येकाच्या जीवनात तणाव असतोच. परंतु तणावमुक्त जीवन जगायचे असेल तर आपले दैनंदिन जीवन विशिष्ट नियमावर असावे. तसेच वेळेत काम करणे, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे हे आनंदी जीवन जगण्याचे मूलमंत्र आहे, असे विचार व्यक्त केले.

**शनिवार दि. २४ जूलै २०२१** (सकाळी १०.०० ते दुपारी १.००)

पहिल्या सत्रात मा. प्रा. भिगा डांगे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपूरी यांनी 'महिला व्यक्तिमत्व विकास व सामाजिक परिस्थिती' या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की, मानवी समाजाचा उद्धार करायचा असेल तर स्त्रीला सार्वजनिक जीवनात सहभागी करण्यासाठी पुरूषांनी प्रेरित करावे किंवा आडकाठी आणू नये आणि यातून खऱ्या अर्थाने सामाजिक उत्थान हाईल, असे मत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. मनोज ठवरे, वाणिज्य विभागप्रमुख यांनी 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, जीवनात यशस्वी होण्यासाठी वेळेचा सदुपयोग विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. तसेच संयम, कठोर परिश्रम, सकारात्मक दृष्टिकोन ही यशाची त्रिसुत्री सांगितली.

**रविवार दि. २५ जूलै २०२१ :— शिबिराचा समारोप**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २५ जूलै २०२१ ला व्यक्तिमत्व विकास शिबिराचा समारोप संपन्न झाला. समारोपीय शिबिरात प्रमुख अतिथी म्हणून आदर्श कला, वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज येथील प्राचार्य डॉ. शंकरलाल कुकरेजा व अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा उपस्थित होते. यावेळी डॉ. शंकरलाल कुकरेजा यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्याने आत्मपरीक्षण करावे. आत्मचिंतनातून अंतर्मुख होऊन

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce Colleges
ARMORI. Distt.Gadchiroli

आपल्या दैनंदिन व्यवहारातील चुका लक्षात घेतल्यास विद्यार्थी आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणू शकतात. कामात नेहमी सातत्य ठेवणे, स्वखुशीने व आनंदाने काम स्वीकारणे ही विद्यार्थ्यांमधील कृतिशीलता, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणारी बाब आहे. विद्यार्थ्याने जीवनात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोण बाळगावा. कारण सकारात्मक दृष्टिकोणातून व्यक्तिमत्त्व विकास शक्य आहे, असे प्रतिपादन केले.

शिबिराचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी विद्यार्थ्यांनी यश मिळविण्यासाठी कठोर मेहनत घेणे आवश्यक आहे. मेहनतीला कोणताही दूसरा पर्याय नसतो. त्याकरिता जीवनात परिश्रम करण्याची तयारी विद्यार्थ्यांनी ठेवावी. विद्यार्थ्यांनी प्रत्येक आव्हानांना आत्मविश्वासाने पुढे जावे व जीवनात सकारात्मकता बाळगल्यास यश मिळाल्याशिवाय राहत नाही. यशस्वीता हे देखील व्यक्तिमत्त्व विकासाचे गमक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.


या आठदिवस चाललेल्या आभासी शिबिराचे अहवाल वाचन रासेयो प्रमुख प्रा. सतेंद्र सोनटक्के यांनी केले. यानिमित्ताने कु. गायत्री चौके, संचित जुवारे, कु. नम्रता जुवारे या विद्यार्थ्यांनी या शिबिरात आलेले अनुभव व्यक्त केले. त्यांनी या शिबिराच्या माध्यमातून आत्मविश्वास बळावल्याची ग्वाही दिली.

समारोपीय शिबिराचे संचालन प्रा. सीमा नागदेवे तर आभार प्रा. गजानन बोरकर यांनी मानले. या शिबिरात २०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यशस्वीतेकरिता शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा प्रमुख प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, तंत्रसहायक प्रा. सुनील चुटे यांनी सहकार्य केले. कार्यशाळेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक सहभागी होते.

M. G. Arts, Science & late N.P. Commerce College *Armori*

प्राचार्य
Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# व्यक्तिमत्व विकास शिबिर
## दि. १८ जूलै २०२१ उद्घाटन समारंभ











PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI Distt.Gadchiroli


## दि. १९ जूलै २०२१ व्यक्तिमत्व विकासावर व्याख्यान


पहिल्या सत्रात 'व्यक्तिमत्त्व विकासात संभाषण कौशल्याचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा



दुसऱ्या सत्रात व्यक्तिमत्त्व विकासा : योग आणि शारीरिक स्वास्थ' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. महेश जोशी






PRINCIPAL
M.G. Arts Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

# दि. २० जूलै २०२१ व्यक्तिमत्व विकासावर व्याख्यान

पहिल्या सत्रात 'नेटवर्कींग क्षेत्र व व्यक्तिमत्व विकास' या विषयावर मार्गदर्शन करताना


मा. श्री. तापोस मंडल






दुसऱ्या सत्रात 'भाषा आणि व्यक्तिमत्व विकास' या विषयावर मार्गदर्शन करताना मराठी विभागाचे

प्रा. डॉ. विजय रैवतकर,










PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli


# दि. २१ जूलै २०२१ व्यक्तिमत्व विकासावर गटचर्चा

गटचर्चेमध्ये सहभागी प्रशिक्षणार्थी, माजी विद्यार्थी व समन्वयक





Science & late N.P. Commerce College

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

## दि. २२ जूलै २०२१ व्यक्तिमत्व विकासावर व्याख्यान


पहिल्या सत्रात 'स्पर्धा परिक्षेमध्ये व्यक्तिमत्व विकासाचे महत्व' या विषयावर मार्गदर्शन करताना राज्यशास्त्र विभागाचे प्रा. पुडलिक व्याहाडकर





दुसऱ्या सत्रात व्यक्तीमत्त्व विकास, व्यावसायिक संधी व आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करताना भूगोल विभागाचे प्रा. डॉ. विजय गोरडे








M.G. Arts, Science & late N.P. Commerce College, Armori

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli


# दि. २३ जूलै २०२१ व्यक्तिमत्व विकासावर व्याख्यान


पहिल्या सत्रात 'व्यक्तिमत्व विकास व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील संधी' या विषयावर मार्गदर्शन करताना मा. श्री. सागर दोनाडकर




दुसऱ्या सत्रात 'व्यक्तिमत्व विकास व तणाव व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करताना शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा प्रमुख प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे








M.G. Arts, Science & late N.P. Commerce College, Armori

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli


# दि. २४ जूलै २०२१ व्यक्तिमत्व विकासावर व्याख्यान

पहिल्या सत्रात 'महिला व्यक्तिमत्व विकास व सामाजिक परिस्थिती' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपूरी येथील प्रा. भिगा डांगे,




दुसऱ्या सत्रात 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर मार्गदर्शन करताना वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. मनोज ठवरे,








PRINCIPAL
M.G.Arts,Science &
late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli


# दि. २५ जूलै २०२१ व्यक्तिमत्व विकास शिबिराचा समारोप


व्यक्तिमत्व विकास शिबिर समारोपप्रसंगी मार्गदर्शन करतांना आदर्श कला, वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज येथील प्राचार्य डॉ. शंकरलाल कुकरेजा




व्यक्तिमत्व विकास शिबिर समारोपप्रसंगी मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा




PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

# व्यक्तिमत्त्व विकास शिबिरात प्रकाशित वृत्तपत्रातील बातमी

## मानवीय मूल्यों का जतन कर व्यक्तित्व निखारें : डा. देव



संवाददाता | आरमोरी.

मानवीय मूल्यों का जतन कर व्यक्तित्व विकास करें। यह प्रतिपादन गोंडवाना विश्वविद्यालय के छात्र विकास विभाग के प्रमुख डा. शैलेंद्र देव ने किया। स्थानीय महात्मा गांधी महाविद्यालय में प्राचार्य डा. लालसिंग खलसा के मार्गदर्शन में महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना, शारीरिक शिक्षा, खेल व क्रीड़ा विभाग और छात्र विकास विभाग गोंडवाना विश्वविद्यालय के संयुक्त तत्वावधान में व्यक्तित्व विकास शिविर का आयोजन हाल ही में किया गया था। वे शिविर के उद्घाटक में बोल रहे थे। गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय कुरखेड़ा के प्रा. डा. नरेंद्र आरेकर उपस्थित थे।

इस समय प्रा. डा. आरेकर ने महाविद्यालयीन विद्यार्थियों के व्यक्तित्व विकास में राष्ट्रीय सेवा योजना का महत्व इस विषय पर मार्गदर्शन किया। कार्यशाला में प्रा. डा. महेश जोशी, तापीय मंडल, प्रा. डा. विजय रैवतकर, प्रा. पुंडलिक व्याहाड़कर, प्रा. डा. विजय गोरडे, सागर दोनाड़कर, प्रा. डा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. भीमा डागे, प्रा. डा. मनोज ठवरे ने मार्गदर्शन किया। सफलतार्थ रासेयो प्रमुख प्रा. सतेंद्र सोनटक्के,प्रा. सीमा नागदेवे, प्रा. डा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. गजानन बोरकर तथा [illegible] प्रा. सुनील चुटे ने सहयोग किया।

लोकमत - 23/07/2021

## मानवी मूल्य जोपासून व्यक्तिमत्व विकसित करा

### कार्यशाळा : डॉ. शैलेंद्र देव यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

आरमोरी : दैनंदिन व्यवहारामुळे स्वतःला इतरांच्या तुलनेत सरस ठेवण्यासाठी व्यक्तिमत्त्व विकासाची गरज आहे. समोरच्या व्यक्तीला आदर दिला, त्यांचा सन्मान केला तर तुमच्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगळीच झळाळी मिळते. त्यांच्या मनात तुमच्याविषयी चांगली भावना निर्माण होते. एकूणच सर्वांगीण मानवी मूल्याची जोपासना करून व्यक्तिमत्त्वाला आकार द्यावा, असे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख डॉ. शैलेंद्र देव यांनी केले.

आरमोरी येथील महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना, शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्यक्तिमत्त्व विकास शिबिरात ते बोलत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी

#### जगण्याचे कौशल्यही आत्मसात करावे


डॉ. खालसा यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमिक शिक्षण घेत असताना जीवनव्यवहारात जगण्याचे कौशल्यदेखील आत्मसात करावे, असे म्हटले. कुरखेडाच्या श्री. गोविंदराव मुनघाटे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर यांनी 'महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व' या विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन त्यांनी केले.

प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा होते.

आठ दिवसीय कार्यशाळेत विविध विषयांवर अनेक क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. यशस्वीतेसाठी रासेयो प्रमुख प्रा. सतेंद्र सोनटक्के, प्रा. सीमा नागदेवे, शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडाप्रमुख प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रा. गजानन बोरकर, तसेच तंत्रसहायक प्रा. सुनील चुटे यांनी सहकार्य केले.

## सकारात्मक दृष्टिकोण के साथ आत्मपरीक्षण भी जरूरी : प्रा.डॉ. कुकरेजा

» महात्मा गांधी महाविद्यालय में आयोजित व्यक्तित्व विकास शिविर का समापन



[illegible]

### पलसगाव में विद्यार्थियों ने किया अभ्यास दौरा

[illegible]

## प्राचार्य डॉ. शंकरलाल कुकरेजा यांचे प्रतिपादन

## सकारात्मकतेतून व्यक्तिमत्त्व विकास शक्य



आरमोरी(वा.). विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन बाळगावा. कारण सकारात्मक दृष्टिकोनातून व्यक्तिमत्व विकास शक्य आहे, असे प्रतिपादन आदर्श कला, वाणिज्य महाविद्यालय देसाईगंज येथील प्राचार्य डॉ. शंकरलाल कुकरेजा यांनी केले.

स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 18 ते 25 जुलै दरम्यान व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा उपस्थित होते.

या आठ दिवसीय शिबिरात विविध विषयांवर अनेक क्षेत्रातील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आलेली होती. यामध्ये व्यक्तिमत्व विकास आणि संभाषण कौशल्य, योग आणि शारीरिक स्वास्थ्य, नेटवर्किंग क्षेत्र, भाषा, स्पर्धा परीक्षा, व्यवसाय संधी व आव्हाने, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील संधी, तणाव व्यवस्थापन अशा विविध विषयाच्या अनुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रा. डॉ.महेश जोशी, तापेय मंडल, प्रा. डॉ. विजय रेवतकर, प्रा. पुंडलिक व्याहाडकर, प्रा. डॉ. विजय गोरडे, सागर दोनाडकर, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. भीमा डांगे, प्रा. डॉ. मनोज ठवरे आदी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

संचालन प्रा. सीमा नागदेवे तर आभार प्रा. गजानन बोरकर यांनी मानले. या शिबिरात 200 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यशस्वीतेकरिता शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा प्रमुख प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, तंत्रसाहायक प्रा. सुनील चुटे यांनी सहकार्य केले. कार्यशाळेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक सहभागी होते.

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी


द्वारा संचालित

**महात्मा गांधी कला, विज्ञान व**
**स्व. नसरूद्दीनभाई पंजवानी वाणिज्य महाविद्यालय**

आरमोरी, जि. गडचिरोली
नॅक पुनर्मानांकित 'अ' दर्जा

## राष्ट्रीय सेवा योजना आणि शारीरिक शिक्षण व खेळ विभाग

### 'व्यक्तिमत्त्व विकास शिबिर'
### सत्र : २०२०–२१




**दिनांक : १८ जुलै २०२१ ते २५ जुलै २०२१**

Registration Link-https://forms.gle/S3PGFxuXWrA6ZyiU8
Zoom Platform Link :- https://us02web.zoom.us/j/3032836362
Meeting ID: 303 283 6362
YouTube Link-https://youtu.be/u8--NjtwGMY

**महोदय/महोदया, सस्नेह नमस्कार !**

शरीराचा रंग व ठेवण, बुध्दी इत्यादी गुण घेऊन व्यक्ती जन्माला येते. हे गुण तिला अनुवंशिकतेने मिळालेले असतात. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हा आमचा प्रमुख उद्देश आहे. कोविड–१९ च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रत्यक्ष शिबीर शक्य नसल्याने आभासी तंत्रज्ञानाद्वारे महाविद्यालयात दि. १८ जुलै ते २५ जुलै २०२१ या कालावधीत 'व्यक्तिमत्त्व विकास शिबिर' आयोजीले आहे.

आपण शिबिराअंतर्गत निर्देशित व्याख्यानांना उपस्थित राहून आम्हाला उपकृत करावे, हि विनंती.

आपले विनीत

**डॉ. लालसिंग खालसा**
**प्राचार्य**
महात्मा गांधी महाविद्यालय,
आरमोरी

**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे**
**शा.शि. आणि खेळ व क्रीडा विभाग**
महात्मा गांधी महाविद्यालय,
आरमोरी

**प्रा. सतेंद्र सोनटक्के**
**रासेयो प्रमुख**
महात्मा गांधी महाविद्यालय,
आरमोरी

**प्रा. सीमा नागदेवे**
**रासेयो कार्यक्रम अधिकारी**
महात्मा गांधी महाविद्यालय,
आरमोरी

**प्रा. गजानन बोरकर**
**राज्यशास्त्र विभाग**
महात्मा गांधी महाविद्यालय,
आरमोरी

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

## ..कार्यक्रम...

**रविवार, दि. १८ जुलै २०२१**

**उद्घाटन समारंभ सकाळी १०.००वा.**

**अध्यक्ष** :– **मा. डॉ. लालसिंग खालसा**
प्राचार्य, महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी

**उद्घाटक** :– **मा. डॉ. शैलेंद्र देव**
संचालक (प्र), विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विशेष अतिथी** :– **मा. प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर**
गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय, कुरखेडा

**विषय** :– राष्ट्रीय सेवा योजना : व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र

**सोमवार दि. १९ जुलै २०२१ सकाळी १०.०० ते १.०० वा.**

**व्याख्यान** :– **मा. डॉ. लालसिंग खालसा, प्राचार्य**
**विषय** :– व्यक्तिमत्त्व विकासात संभाषण कौशल्याचे महत्व

**व्याख्यान** :– **मा. प्रा. डॉ. महेश जोशी**
**विषय** :– व्यक्तिमत्त्व विकास : योग आणि शारीरिक स्वास्थ

**मंगळवार दि. २० जुलै २०२१ सकाळी १०.०० ते १.०० वा.**

**व्याख्यान** :– **मा. श्री. तापोस मंडल,**
STC, MI Life Style Global Marketing Pvt. Ltd.
**विषय** :– नेटवर्कींग क्षेत्र व व्यक्तिमत्त्व विकास

**व्याख्यान** :– **प्रा. डॉ. विजय रैवतकर**
**विषय** :– भाषा आणि व्यक्तिमत्त्व विकास

**बुधवार दि. २१ जुलै २०२१ सकाळी १०.०० ते १.०० वा.**

**गटचर्चा** :– सहभागी प्रशिक्षणार्थी व संमन्वयक
**विषय** :– व्यक्तिमत्त्व विकासासाठी ग्रामिण विद्यार्थ्यां पुढिल आव्हाने

**गुरूवार दि. २२ जुलै २०२१ सकाळी १०.०० ते १.०० वा.**

**व्याख्यान** :– **प्रा. पुंडलिक व्याहाडकर**
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी
**विषय** :– स्पर्धा परिक्षेमध्ये व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्व

**व्याख्यान** :– **प्रा. डॉ. विजय गोरडे**
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी
**विषय** :– व्यक्तिमत्त्व विकास :व्यवसाय संधी व आव्हाने

**शुक्रवार दि. २३ जुलै २०२१ सकाळी १०.०० ते १.०० वा.**

**व्याख्यान** :– **मा. श्री. सागर दोनाडकर,**
Software Engineer : Alepo technology
**विषय** :– व्यक्तिमत्त्व विकास व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील संधी

**व्याख्यान** :– **प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे**
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी
**विषय** :– व्यक्तिमत्त्व विकास व तणाव व्यवस्थापन

**शनिवार दि. २४ जुलै २०२१ सकाळी १०.०० ते १.०० वा.**

**व्याख्यान** :– **मा. प्रा. भिमा डांगे**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपूरी
**विषय** :– महिला व्यक्तिमत्त्व विकास व समाजिक परिस्थीती
**व्याख्यान** :– **प्रा. डॉ. मनोज ठवरे**
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी
**विषय** :– व्यक्तिमत्त्व विकास

**रविवार, दि. २५ जुलै २०२१**

**समारोप सकाळी १०.००वा.**

**अध्यक्ष** :– **मा. डॉ. लालसिंग खालसा**
प्राचार्य, महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी

**विशेष अतिथी** :– **मा. डॉ. शंकरलाल कुकरेजा**
प्राचार्य, आदर्श महाविद्यालय, वडसा

**विषय** :– व्यक्तित्त्व व आत्मविश्वास

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli



# महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं.
# वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी जिल्हा-गडचिरोली.
## महाराष्ट्र राज्य पिन क्र.-४४१२०८

नॅक पुनर्मानांकित 'अ' दर्जा

## प्रमाणपत्र

श्री./कु. ............................................................वर्ग...................... यांनी महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी जिल्हा-गडचिरोली येथील रा.से.यो., शारीरिक शिक्षण, व खेळ विभाग आणि विद्यार्थी कल्याण विभाग गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत ऑनलाईन "व्यक्तिमत्व विकास शिबीर" दिनांक १८ जुलै ते 25 जुलै २०२१ यात सक्रीय सहभाग दर्शविला.

करिता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

भविष्यातील वाटचालीकरीत हार्दिक शुभेच्छा!

| | | | |
|---|---|---|---|
| समन्वयक | समन्वयक | समन्वयक | आयोजक |
| प्रा.गजानन बोरकर | डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे | प्रा. सतेंद्र सोनटक्के | डॉ लालसिंग खालसा<br>प्राचार्य |

M.G. Arts, Science & late N.P Commerce College

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli